# महाराष्ट्र शासन

## इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई

## कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), महाराष्ट्र राज्य, नागपूर

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – 440022**

**Website : www.vanarti.in** **CIN : U84120MH2026NPL466492** **Email : vanarti.info@gmail.com**

जा.क्र. वनार्टी/नागपूर/आस्था/517/2026-27 दि. 23/06/2026

## -: <u>योजनेचा तपशील</u> :-

**<u>वनार्टी मार्फत “केंद्रीय लोकसेवा आयोग (भारतीय वन सेवा) पूर्व परीक्षा – 2026” उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेकरिता अर्थसहाय्य योजनेचा तपशील</u>**

महाराष्ट्र राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील जे विद्यार्थी मार्फत **“केंद्रीय लोकसेवा आयोग (भारतीय वन सेवा) पूर्व परीक्षा–2026”** (दि. 15/06/2026 रोजी UPSC ने जाहीर केलेल्या निकालानुसार) उत्तीर्ण झालेले आहेत. अशा विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेकरिता एकरकमी अर्थसहाय्य प्रदान करण्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

**योजनेच्या लाभासाठी पात्रता :**

1. विद्यार्थी महाराष्ट्रातील रहिवासी असावा.
2. विद्यार्थी हा नॉन-क्रिमिलेअर गटातील विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील असावा/असावी.
3. विद्यार्थी हा मार्फत **“केंद्रीय लोकसेवा आयोग (भारतीय वन सेवा) पूर्व परीक्षा – 2026”** (दि. 15/06/2026 रोजी UPSC ने जाहीर केलेल्या निकालानुसार) उत्तीर्ण झालेला असावा/असावी. ज्या विद्यार्थ्यांना सदर परीक्षेकरिता महाज्योती संस्थेमार्फत अर्थसहाय्य मिळत असल्यास अश्या विद्यार्थ्यांना सदर योजनेच्या लाभासाठी ग्राह्य धरल्या जाणार नाही.

**अर्ज करण्यासाठी आवश्यक वैयक्तिक कागदपत्रे :**

1. आधार कार्ड (पुढील व मागील बाजूसह)
2. जातीचे प्रमाणपत्र (Caste Certificate)
3. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate)
4. “केंद्रीय लोकसेवा आयोग (भारतीय वन सेवा) पूर्व परीक्षा–2026” चे प्रवेशपत्र
5. “केंद्रीय लोकसेवा आयोग (भारतीय वन सेवा) पूर्व परीक्षा–2026” उत्तीर्ण झालेल्या निकालाचा पुरावा (बैठक क्रमांक ठळक करून देण्यात यावा.)

**अर्ज कसा करावा :**

1. वनार्टीच्या www.vanarti.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील "Application Invited For Financial Assistance to Those Who Have Qualified For Indian Forest Service (IFS) Mains – 2026" या लिंकवर जाऊन ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावा.
2. अर्जासोबत वरील नमूद कागदपत्रे स्वाक्षांकित करून स्पष्ट दिसतील अशा स्वरूपात स्कॅन करून अपलोड करावीत.

**अटी व शर्ती :**

1. अर्ज करण्याची अंतिम दिनांक 10/07/2026 आहे.
2. पोस्टाने किंवा ई-मेलद्वारे प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही.
3. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे अथवा स्वीकारणे याबाबतचे सर्व अधिकार व्यवस्थापकीय संचालक, वनार्टी यांचे राहतील.
4. कोणत्याही माध्यमातून व अंतिम निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर विद्यार्थ्यांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण किंवा दिशाभूल करणारी असल्याचे आढळल्यास संबंधित विद्यार्थी कायदेशीर कारवाईस पात्र राहील.
5. विद्यार्थ्यांचे बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न असणे आवश्यक आहे.
6. अर्ज भरताना कोणत्याही प्रकारची अडचण आल्यास केवळ वनार्टी Call Centre वर पुढील क्रमांकावर संपर्क साधावा : +91 788 788 2026

**स्वा**
**(प्रशांत वावगे)**
व्यवस्थापकीय संचालक
वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(वनार्टी) महाराष्ट्र राज्य, नागपूर